# मुंबई विद्यापीठ

## परिपत्रक

(REG/ICC/2019-20/39)

दि.६ एप्रिल, २०२०

**विषय- कोविड-१९ च्या उद्रेकादरम्यान आणि नंतर विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य आणि कल्याणाबाबत**

संदर्भ- शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) मराहाष्ट्र राज्य, क्र. उशिसं/ कोरोना/ मवि-१/२०२०/ ४०८८

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचेकडील क्र. F .No. १-१/ २०२० (Secy) दि. ०५/०४/२०२०

उपरोक्त विषयाच्या आणि संदर्भाधिन पत्रांच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येत आहे की विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडून वेळोवेळी सूचना निर्गमित केल्या जातात. आपणांस माहित आहेच की देशासह राज्यात कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे संकटकालीन परिस्थिती निर्माण झाली आहे. देशात २१ दिवसासाठी बंद (LOCKDOWN) ठेवण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य आणि समाज मनस्थिती बाबत जागरुक राहून कोविड-१९ च्या उद्रेकादरम्यान आणि नंतर विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य आणि कल्याणाबाबत काही कार्ये करणे अपेक्षित आहे. त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांना अभ्यासाच्या दृष्टिकोनातून, शैक्षणिक, आरोग्य अशा आनुषंगिक बाबीतून कोणताही ताण किंवा भीतीचे वातावरण राहू नये यासाठी विद्यापीठ आणि महाविद्यालयांनी खाली नमूद केलेल्या उपाययोजना करणे अपेक्षित आहे.

१) विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य आणि समाज मनस्थिती आणि कल्याणासाठी विद्यापीठ आणि महाविद्यालयीन स्तरावर हेल्पलाईन सुरू करणे, तसेच या हेल्पलाईनचे नियमित स्वरुपात समुपदेशक आणि इतर शिक्षकांकडून याची देखरेख आणि व्यवस्थापन करणे

२) उद्भवलेल्या या परिस्थितीत विद्यार्थ्यांनी कोणताही ताण किंवा भीती बाळगू नये यासाठी विद्यापीठ आणि महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांशी नियमित संवाद साधावा. यासाठी दूरध्वनी, ई-मेल, डिजीटल आणि समाज माध्ममाचा वापर केला जाऊ शकतो.

३) कोविड-१९ मुळे उद्भवेल्या परिस्थितीत गरजू विद्यार्थी, विद्यार्थी समूह यांना मदत करण्यासाठी वसतिगृहे अधीक्षक, वरिष्ठ प्राध्यापकांनी पुढे येऊन अशा गरजू विद्यार्थ्यांना तातडीने मदत करावी.

४) आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांची विडिओ लिंक विद्यापीठ व महाविद्यालयांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी, तसेच या विडिओ लिंकचा समाजमाध्यमातून अधिकाधीक प्रसार करावा.

त्याचबरोबर:

- **Practical tips to take care of your Mental Health during the Stay In**
  **https://www.youtube.com/watch?v=uHB3WJsLJ8s&feature=youtu.be**
- **Minding our minds during the COVID-19**
  **https://www.mohfw.gov.in/pdf/MindingourmindsduringCoronaeditedat.pdf**
- **Various Health Experts on how to manage Mental health & Well Being during COVID-19 outbreak**
  **https://www.youtube.com/watch?v=iuKhtSehp24&feature=youtu.be**
- **Behavioural Health: Pschyo-Social toll free helpline - 0804611007**

वर निर्दिष्ट केलेल्या लिंकचाही प्रसार करण्यात यावा.

या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाशी सलंग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, संचालक मान्यताप्राप्त संस्था आणि समन्वयक आदर्श महाविद्यालये यांनी उपरोक्त उपाययोजनांची अंमलबजावणी नियमित पद्धतीने करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठास सादर करावा.

(डॉ. अजय देशमुख)

कुलसचिव

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी-**

सर्व संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य/ संचालक, मान्यताप्राप्त संस्था, समन्वयक आदर्श महाविद्यालये